# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-अ

वर्ष १, अंक ८०(२)] सोमवार, जानेवारी ११, २०१०/पौष २१, शके १९३१ [पृष्ठे १४

किंमत : रुपये १९.००


असाधारण क्रमांक १४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जानेवारी २०१०

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक रेशीम. १३२०००/प्र.क्र. ३९/रेशीम कक्ष.— भारताचे संविधान यांच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील रेशीम संचालनालयातील रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-२, गट 'ब' (अराजपत्रित) ; वरिष्ठ तंत्र सहाय्यक, वरिष्ठ क्षेत्र-नि-प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोग निर्देशक, क्षेत्र सहाय्यक, परिपालन कामगार (रेअरींग ऑपरेटिव्ह),- गट 'क' आणि परिपालक (रेअरर्स), परिचर, प्रयोगशाळा परिचर, गट 'ड' या पदांच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, रेशीम संचालनालयातील रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-२, गट 'ब' (अराजपत्रित), वरिष्ठ तंत्र सहाय्यक, वरिष्ठ क्षेत्र-नि-प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोग निर्देशक, क्षेत्र सहाय्यक, परिपालन कामगार

(रेअरींग ऑपरेटिव्ह), गट- ' क ' आणि परिपालक (रेअर्स), परिचर, प्रयोगशाळा परिचर, गट ' ड ', या पदांचे (सेवाप्रवेश) नियम, २००९ असे म्हणावे.

२. या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) " पदवी " याचा अर्थ, सांविधीक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ख) " विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, असा आहे ;

(ग) " संचालक " याचा अर्थ, रेशीम संचालक, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(घ) " संचालनालय " याचा अर्थ, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ङ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " मान्यताप्राप्त संस्था " याचा अर्थ, शासनाची मान्यता मिळालेली संस्था, असा आहे ;

(छ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ, अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने घेतलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा असून आणि यात शासनाने या परीक्षेस समतुल्य असल्याचे घोषित केलेल्या इतर कोणत्याही परीक्षेचा अंतर्भाव असेल.

३. संचालनालयातील रेशीम विकास अधिकारी, श्रेणी २, या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) वरिष्ठा तंत्र सहाय्यक पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या आणि या नियमातील खंड (ख) (दोन) मध्ये, नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तिमधून वरिष्ठतेच्या आधारे, पात्रतेच्या अधिनतेने योग्य व्यक्तिच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ;

किंवा

(ख) (एक) ज्यांचे वय ३६ वर्षांहून अधिक नसेल,—

(दोन) ज्यांनी सांविधिक विद्यापिठाची कृषिशास्त्र किंवा रेशीम किंवा जीवशास्त्र किंवा प्राणीशास्त्र अथवा वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी यापैकी कोणत्याही विषयातील प्रथम श्रेणीसह विज्ञान शाखेतील पदवी धारण केलेली असेल ;

(तीन) उपखंड (ख) (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय विभागामधील किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील किंवा शासनाने स्थापन केलेल्या सांविधिक मंडळातील किंवा महामंडळातील जबाबदारीच्या पदावरील तीन वर्षांहून कमी नसेल इतका प्रशासकीय जबाबदाऱ्यासह प्रत्यक्ष अनुभव धारण केलेला असेल ;

(चार) ज्याला मराठी आणि हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल ;

अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, ज्या उमेदवाराकडे त्या विषयातील असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असेल अशा उमेदवारांबाबत शासनाच्या मान्यतेने कमाल वयोमर्यादा ४० वर्षापर्यंत किंवा अनुभवाचा कालावधी किमान २ वर्षापर्यंत शासनाला शिथिल करता येईल :

परंतु, आणखी असे की, ज्या उमेदवाराकडे रेशीम उत्पादन विषयातील स्नातकोत्तर पदवी/पदविका असेल किंवा त्या विषयातील असामान्य अनुभव किंवा दोन्ही असेल त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल ;

किंवा

(ग) इतर विभागातील समकक्ष पद धारण करणाऱ्या आणि उपखंड (ख) (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

४. वरिष्ठ तंत्र सहायक, या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) वरिष्ठ क्षेत्र-नि- प्रयोगशाळा हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिमधून वरिष्ठतेच्या आधारे पात्रतेच्या अधिनतेने योग्य व्यक्तिच्या पदोन्नतीने भरण्यात येईल ;

किंवा

(ख) (एक) ज्यांचे वय ३३ वर्षांहून अधिक नसेल ;

(दोन) ज्याने कृषिशास्त्र किंवा रेशीम किंवा जीवशास्त्र किंवा प्राणीशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र यापैकी कोणत्याही विषयासह विज्ञान शाखेतील पदवी धारण केली असेल ;

(तीन) ज्याला मराठी आणि हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल ;

अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, ज्या उमेदवाराकडे रेशीम उत्पादन विषयातील स्नातकोत्तर पदवी किंवा पदविका किंवा या विषयातील असामान्य अनुभव असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल ;

किंवा

(ग) इतर विभागात समकक्ष पद धारण करणाऱ्या आणि उपखंड (ख) (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

५. रेशीम संचालनालयातील वरिष्ठ क्षेत्र-नि- प्रयोगशाळा सहायक, या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) प्रयोगनिर्देशक किंवा क्षेत्र सहायक हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिमधून वरिष्ठतेच्या आधारे पात्रतेच्या अधिनतेने योग्य व्यक्तिच्या पदोन्नतीने भरण्यात येईल ;

किंवा

(ख) (एक) ज्यांचे वय ३३ वर्षांहून अधिक नसेल ;

(दोन) ज्याने कृषिशास्त्र किंवा रेशीम उत्पादन या विषयासह किंवा जीवशास्त्र किंवा प्राणीशास्त्र अथवा वनस्पतीशास्त्र हा मुख्य विषय घेवून विज्ञान शाखेतील पदवी धारण केली असेल ;

(तीन) ज्याला मराठी आणि हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल ;

अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, रेशीम उत्पादन या विषयातील पदवी किंवा स्नातकोत्तर पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल ;

किंवा

(ग) शासनाच्या इतर विभागात समकक्ष पदावर काम करीत असलेल्या आणि उपखंड (ख) (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

६. रेशीम संचालनालयातील प्रयोगनिर्देशक, या पदावरील नियुक्ती,—

(क) (एक) ज्यांचे वय ३३ वर्षांहून अधिक नसेल ;

(दोन) ज्याने विज्ञान विषयासह उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली असून मान्यताप्राप्त संस्थेतून रेशीम उत्पादन प्रशिक्षण किंवा कृषिशास्त्र पदविका धारण केली असेल ;

(तीन) ज्याला मराठी आणि हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल ;

अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, रेशीम उत्पादन या विषयातील पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल ;

किंवा

(ख) शासनाच्या इतर विभागात समकक्ष पदावर काम करीत असलेल्या आणि या नियमाच्या खंड (क) उपखंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

७. रेशीम संचालनालयातील क्षेत्र सहायक, या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) परिपालन कामगार (रेअरींग ऑपरेटिव्ह) हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या आणि या नियमाच्या खंड (ख) उप खंड (दोन) मध्ये, नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तिमधून वरिष्ठतेच्या आधारे योग्यतेच्या अधिनतेने योग्य व्यक्तिच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ;

किंवा

(ख) (एक) ज्यांचे वय ३३ वर्षांहून अधिक नसेल ;

(दोन) ज्याने विज्ञान विषयासह उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली असून ज्याने मान्यताप्राप्त संस्थेतून रेशीम उत्पादनातील प्रशिक्षणघेतले असेल किंवा कृषिशास्त्रातील पदविका धारण केली असेल ;

(तीन) ज्याला मराठी आणि हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल ;

अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, रेशीम उत्पादन या विषयातील पदविका धारकास प्राधान्य देण्यात येईल ;

किंवा

(ग) शासनाच्या इतर विभागात समकक्ष पदावर कामकरित असलेल्या आणि या नियमाच्या खंड (ख) उप खंड (दोन) नूसार अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल;

८. रेशीम संचालनालयातील परिपालन कामगार (रेअरींग ऑपरेटिव्ह), या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) संचालनालयातील परिपालन (रेअरर्स), परिचर किंवा प्रयोगशाळा परिचर हे पद धारण करणाऱ्या अथवा त्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या आणि या नियमाच्या खंड (ख) उप खंड (दोन) मध्ये नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून वरिष्ठतेच्या आधारे पात्रतेच्या अधीनतेने योग्य व्यक्तिच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ;

किंवा

(ख) (एक) ज्यांचे वय ३३ वर्षांहून अधिक नसेल ;

(दोन) ज्याने विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण केली असेल ;

(तीन) ज्याला मराठी आणि हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल ;

अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

किंवा

(ग) शासनाच्या अन्य विभागात समकक्ष पदावर काम करणाऱ्या आणि या नियमाच्या खंड (ख) उप खंड (दोन) मध्ये अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

९. रेशीम संचालनालयातील ड-गटातील परिपालन (रेअरर्स), परिचर, प्रयोगशाला परिचर, या पदावरील नियुक्ती एकतर,—

(एक) ज्यांचे वय ३३ वर्षांहून अधिक नसेल ;

(दोन) ज्याने किमान आठवी परिक्षा उत्तीर्ण केली असेल ;

(तीन) ज्याला मराठी आणि हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल ;

अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

१०. (क) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नती व नामनिर्देशद्वारे करावयाची नियुक्ती ३:१ या प्राणात ;

(ख) नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाची नियुक्ती अनुक्रमे १:१ व १:२ या प्रमाणात करण्यात येईल. यापैकी, प्रयोग निर्देशक व क्षेत्र सहायक या संवर्गातून देण्यात येणारी पदोन्नती अनुक्रमे १:३ या प्रामाणात करण्यात येईल ; आणि

(ग) नियम ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाची नियुक्ती अनुक्रमे १:२५ व १:३ या प्रमाणात करण्यात येईल.

११. नियम ३,४,५,६, आणि ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीने, त्या संदर्भात करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा -जर तिने त्या अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील; किंवा तिला त्या उत्तीर्ण करण्यापासून सूट मिळालेली नसेल तर, उत्तीर्ण करणे अवश्यक असेल.

१२. नियम ३,४, आणि ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीने, केंद्रिय रेशमी संस्थेचे रेशमी उत्पादनातील प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक असेल.

१३. नियम ६, ७ आणि ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीने, शासनाने मान्यता दिलेला रेशीम, रेशीम उत्पादनातील अल्प मुदतीचा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल.

१४. नियम ३,४,५,६, ७ आणि ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहीत करण्यात आलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

१५. या नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेची निकड लक्षात घेऊन शासनाच्या मते आवश्यक असेल तेव्हा शासनास; निवड प्रधिकाऱ्याशी विचारविनियमय करून, नियम ३,४,५,६,७,८ आणि ९ मधील पदावर नामनिर्देशनाद्वारे सेवाप्रवेशाचे जे प्रमाण या नियमांत विहित केले आहे. ते शिथिल करून, नियुक्ती करता येईल.

१६. नियम ३,४,५,६,७,८ आणि ९ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कुठेही बदली होण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गणेश राठोड,**
शासनाचे उप सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Sericulture Cell Mantralaya Mumbai 400 032,
dated the 5th January 2010

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Reshim 132000/C.R. 39/Reshim Cell.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India,the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Sericulture Development Officer Grade-II, Group-B (Non Gazetted); Senior Technical Assistant, Senior Field, cum Laboratory Assistant, Demonstrator, Field Assistant, Rearing operative, Group 'C' and Rearers Attendant, Laboratory Attendant, Group 'D' in the Directorate of Sericulture under the Co-operation,Markting and Textiles Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Sericulture Development Officer, Grade-II Group- 'B' (Non-Gazetted); Senior Technical Assistant, Senior Field-*Cum* Laboratory Assistant, Demostrator, Field assistant, Rearing Operative Group-C and Rearers, Attendant, Laboratory Attendant Group-D, in the Directorate of Sericulture (Recruitment) Rules, 2009.

2. In these rules, unless the context requires otherwise,

(*a*) " Degree " means a Degree of statutory University ;

(*b*) " Department " means the Co-operation, Marketing and Textile Department of the Government Maharashtra ;

(*c*) " Director " means the Director of Sericlture Government of Maharashtra;

(*d*) " Directorate " means the Directorate of Sericulture, Government of Maharashtra ;

(*e*) " Government " means the Government of Maharashtra ; "Recognized Institution" means an institution recognized by Government ;

(*g*) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by a Division Board under the Maharashtra Secondary Education Board Act, 1965 (Mah. XLI 1965) and includes any other examination declared by Government to be equivalent thereto.

3. Appointment to the post of Sericulture Development Officer, Grade-II, in the Directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of Seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Senior Technical Assistant, having not less than three years regular service in that post and possess qualification and experience precribed for appointment by nomination in clause (*b*) (*ii*) of this rules,

or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than 36 years of age,

(*ii*) possess a Degree in Science, with Agriculture or Sericulture or Biology or Zoology or Botany or Textile Engineering, in First Class ;

(*iii*) possess practical experience in responsible position involving administrative responsibilities for period of not less than three years in any Industry or Government Department or Public Sector Undertaking or Statutory Board or Corporation established by Government or Sericulture Industry gained after acquiring the qualification mentioned in sub-clause (*b*) (*ii*).

(*iv*) possess adequate knowledge of Marathi and Hindi Language :

Provided that, the uper age limit may be relaxed by the Government upto 40 years or expericence period may be relaxed to minimum two years with the approval of the Government in favour of a candidate having exceptional qualification or experience or both :

Provided further that, preference may be given to a candidate possessing Post Graduate Degree/Diploma in Sericulture or possess exceptional educational qulification in that subject or such experience or both.

or

(*b*) by transfer of a suitable person holding equivalent post in other department who possess qulification mentioned in (*ii*) of sub-clause (*b*) ;

4. Appointment to the post of Senior Technical Assistant, in the Directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of Seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Senior Filed-*cum*-Laboratory Assistant, having not less than three years regular service in that post,

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than 33 years of age,

(*ii*) possess a Degree in Science, with Agriculture or Sericulture or Biology or Zoology or Botany as one subject ;

(*iii*) possess adequate knowledge of Marathi and Hindi language :

provided that, preference may be given to candidates possessing Degree in Sericulture or post-graduate Diploma or who possess extra-ordinary educational qualification in this subject ;

or

(*c*) by transfer of suitable or person holding equivalent post in other departments of Government who possess qualification mentioned in sub-clause b (*ii*).

5. Appointment to the post of Senior Filed-*cum* Laboratory Assistant, in the Directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Demonstrator or Field Assistant, having not less than three years regular service in that post,

or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than 33 years of age,

(*ii*) possess a Degree in Science, with Agriculture or Sericulture or Biology or Zoology or Botany as main subject ;

(*iii*) possess adequate knowledge or Marathi and Hindi language :

Provided that, preference may be given to candidates possessing Degree or post-graduate Diploma in Sericulture or who possess extra-ordinary educational qualification in this subject,

or

(*c*) by transfer of a suitable or person holding equivalent post in other departments of Government who possess qualification mentioned in sub-clause b (*ii*) ;

6. Appointment to the post of Demonstrator, in the Directorate shall be made by,—

(*a*) by nomination from amongst candidates who,—

(*i*) are not more than 33 years of age,

(*ii*) have passed the Higher Secondary School Certificate Examination with Science subject or have passed Secondary the School Certificate Examination and possess Training in Sericulture or Diploma in Agriculture, from Recognized Institute,

(*iii*) possess adequate knowledge of Marathi and Hindi language :

.Provided that, preference will be given to Sericulture Diploma Holder,

or

(*b*) by transfer of a suitable person holding equivalent post in other departments of Government who possess qualification mentioned in sub-clause (*ii*) of clause (a) of this rule.

7. Appointment to the post of field Assistant, in the Directorate shall be made either,—

*(a)* by promotion of a suitable person on the basis of seniority, subject to Fitness, from amongst the persons holding the post of Rearing Operative having not less than three years regular service in that post and possess qualification prescribed for appointment by nomination in sub-clause b *(ii)* of clause *(b)* of this rule;

or

*(b)* by nomination from amongst candidates who,—

*(i)* are not more than 33 years of age.

*(ii)* have passed possess the Higher Secondary School Certificate Examination, with Science subject or have passed the Secondary School Certificate and possess Training in Sericulture or a Diploma in Agriculture, from recognized Institute,

*(iii)* possess adequate knowledge of Marathi and Hindi language :

Provided that, preference will be given to a Sericulture Diploma holder,

or

*(c)* by transfer of a suitable or person holding equivalent post in other departments of Government who possess qualification as sub-clause *(ii)* of clause (*b*) of this rule.

8. Appointment to the post of Rearing Operative, in the Directorate shall be made either,—

(a) by promotion of suitable person on the basis of seniority subject to Fitness from amongst the person holding the post of Reaer, Attendant or Laboratory Attendant or having not less than three years regular service in that post and possess in a qualification prescribed for appointment by nomination mentioned in sub-clause *(ii)* of clause *(b)* of this rule,

or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than 33 years of age ;

(*ii*) have passed the Secondary School Certificate Examination with Science, atleast in Second class ;

(*iii*) possess adequate knowledge of Marathi and Hindi language.

or

(*c*) by transfer of a suitable or person holding equivalent post in other departments of Government who possess qualification mentioned in sub-clause (*ii*) of clause (*b*) of this rule.

9. Appointment to the post of Rears, Attendant, Laboratory Attendant, Group-D in the Directorate shall be made by nomination from amongest candidates who,—

(*i*) are not more than 33 years of age ;

(*ii*) have passed minimum Eight Standard ;

(*iii*) possess adequate knowledge of Marathi and Hindi Language.

10. Appointment to the post mentioned (a) in-rule 3 by promotion and nomination shall be made in ratio of 3:1 (b) in rules 4 and 5 promotion and nomination shall be made in the ratio of 1:1 and 1:2 respectively, or which promotion from the cadre of Demonstrators and Field Assistant shall be in the ratio of 1:3 respectively, and (c) in rules 6 and 7 promotion and nomination shall be made in the ratio of 1:25 and 1:3, respectively.

11. A person appointed to the post mentioned in rules 3,4,5,6, and 7 shall be required to pass the examination in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

12. A person appointed to the post mentioned in rules 3, 4 and 5 shall be required has to undergo Training in Sericulture from Central Silk Board Institute.

13. A person appointed to the post mentioned in rules 6, 7 and 8 has to undergo Short term course in Sericulture approved by the Government.

14. A person appointed to the post mentioned in rules 3,4,5,6,7 and 8 should possess a certificate of computer operation prescribed by the Directorate of information Technology of Government of Maharashtra, from time to time.

15. Notwithstanding anything contained in these rules if in the opinion of the Government the exigencies of service so require, Government may, after consultation with the Selection Authority, wherever necessary make appointments to the post mentioned in 3,4,5,6,7,8 and 9 in relaxation of the ratio prescribed in these rules for recruitment by nomination.

16. A person appointed to the posts mentioned in rules 3,4,5,6,7,8 and 9 shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

GANESH RATHOD,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.